आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र– रात्री ८.०० वाजता

२५ नोव्हेंबर २०२२ – शुक्रवार

**ठळक बातम्या**

- भारताचा इतिहास म्हणजे गुलामगिरीची कहाणी नसून शौर्य, त्याग आणि निर्भयतेची गाथा असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- पर्यावरण संरक्षण, कोरोनामुळे निर्माण झालेली परिस्थिती, आणि विषमते विरुध्द लढण्यासाठी सर्व देशांनी एकत्र येण्याचं संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांचं भारत प्रशांत क्षेत्रीय संवादात आवाहन

- संसदेच्या आगामी हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर येत्या ६ डिसेंबरला सर्वपक्षीय बैठक

- सातारा जिल्ह्यात पाचशे एकर क्षेत्रात कृषी उद्योग उभारण्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

**आणि**

- ऑकलंड इथं झालेल्या पहिल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात न्यूझीलंडचा भारतावर ७ गडी राखून विजय

**<><><><><><>**

भारताचा इतिहास म्हणजे गुलामगिरीची कहाणी नसून शौर्य, त्याग आणि निर्भयतेची गाथा आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. आसाममधले  अहोम सेनापती लचित बारफुकन यांच्या ४०० व्या जयंती महोत्सवाचा  सांगता समारंभ दिल्लीत झाला, त्यावेळी ते बोलत होते. चुकीच्या पद्धतीनं लिहिलेला इतिहास पुन्हा नव्यानं लिहायची गरज त्यांनी अधोरेखित केली.

ब्रिटिश  काळानंतर झालेल्या चुका आता सुधारल्या जात आहेत, असंही त्यांनी सांगितलं.

लचित बारफुकन यांनी आपल्याला देशभक्तीची शिकवण दिल्याचं ते म्हणाले. तलवारीच्या जोरावर भारताचा शाश्वत वारसा मिटवू पाहणाऱ्यांना कडक उत्तर देणं भारताला चांगलंच जमतं, असा इशारा त्यांनी यावेळी  दिला.

लचित बारफुकन हे मूर्तिमंत शौर्याचं प्रतीक आहे, अशा शब्दांत केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. ईशान्य भारताच्या विकासासाठी प्रधानमंत्री मोदी सतत प्रयत्नशील असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सर्वोच्च न्यायालयात सकाळी १० वाजता होणाऱ्या संविधान दिन कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमात ते इ- न्यायालय प्रकल्पातल्या विविध उपक्रमांचं उद्घाटन करतील. माहिती आणि संज्ञापन तंत्रज्ञानाच्या आधारे याचिकाकर्ते,वकील आणि न्यायालयांना सेवा पुरवणं  यासाठी इ- न्यायालय प्रकल्प सुरू केला जात आहे. त्यापैकी  आभासी न्याय घड्याळ, JustIS मोबाईल ॲप २.०, डिजिटल न्यायालय यांचं उद्घाटन उद्या होईल. या मोबाईल  ॲपमुळे उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना प्रलंबित खटले आणि त्यांचे निकाल   यावर लक्ष ठेवता   येईल.

**<><><><><>**

संविधान दिवसाच्या पूर्वसंध्येला संसदीय कार्यमंत्री प्रल्हाद जोशी यांच्या हस्ते विशेष पोर्टल्सचं उदघाटन झालं . या पोर्टलवर संविधानाच्या उद्देशिका इंग्रजी आणि २२ अधिकृत  भाषांमध्ये   उपलब्ध आहेत. तसच संविधान संबंधित प्रश्नमंजुषाही इथे

पाहायला मिळतील **www.readpreamble.nic.in** यावर ही सुविधा देशवासियांना उपलब्ध आहे.

**<><><><><>**

पर्यावरणाच्या संरक्षणासाठी, कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी तसंच व्यापक असमानते विरुध्द लढण्यासाठी सर्व देशांनी एकत्र येणं गरजेचं असल्याचं मत संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी व्यक्त केलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं आयोजित भारत प्रशांत क्षेत्रीय संवाद 2022 या कार्यक्रमात बोलत होते. विनाशकारी युध्द आणि संघर्षाची पर्वा न करता सर्व देशांनी एकत्रीतपणे या समस्यांचा सामना करायला हवा, असंही ते म्हणाले. सामुहिक सुरक्षेचा मापदंड बदलण्याची गरज सिंग यांनी व्यक्त केली. जगाच्या आर्थिक स्थैर्यासाठी भारत - प्रशांत क्षेत्राचा विकास होणं गरजेचं आहे. विभिन्न देशातल्या सागरी मार्गांमुळे व्यापार वाढीला चालना मिळाली असल्याचं ते म्हणाले. भारत- प्रशांत क्षेत्रात आसियानची मध्यवर्ती भूमिका स्वागतार्ह आहे. बहुपक्षीय नितीचं ध्येय वर्तालाप करुनच साध्य होईल, यावर त्यांनी जोर दिला.

**<><><><><>**

संसदेच्या आगामी हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकारनं येत्या ६ डिसेंबरला सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. या अधिवेशनात संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरळीत चालावं, यासाठी सर्व राजकीय पक्षांचं सहकार्य मिळवण्याकरता ही बैठक आयोजित केली आहे. या अधिवेशनात विधायक चर्चा होतील, अशी अपेक्षा केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी व्यक्त केली आहे.

हिवाळी अधिवेशन येत्या ७ डिसेंबरला सुरु होणार आहे. हे २९ डिसेंबरपर्यंत चालेल.

<><><><><><>

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज दिल्ली इथं राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या अर्थमंत्र्यांशी अर्थसंकल्पपूर्व चर्चा केली. या बैठकीला केंद्रीय अर्थ राज्यमंत्री , मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, जम्मू आणि काश्मीरचे नायब राज्यपाल, अर्थमंत्री, मंत्री आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. अर्थ मंत्रालयाच्या आर्थिक व्यवहार विभागाच्या सचिवांनी बैठकीत सर्व सहभागींचं स्वागत केलं आणि आगामी अर्थसंकल्पाच्या दृष्टीनं या विशेष बैठकीचं महत्त्व सांगितलं.

कर्ज घेण्याची मर्यादा वाढवून, आगाऊ दोन हप्ते आणि भांडवली खर्चासाठी विशेष सहाय्याद्वारे आर्थिक मदत केल्याबद्दल उपस्थितांनी केंद्रीय अर्थमंत्र्यांचे आभार मानले. केंद्रीय अर्थमंत्र्यांना अर्थसंकल्पीय भाषणात समावेश करण्यासाठी अनेक सूचनाही दिल्या.

<><><><><><>

नागपूर इथं डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या मैदानात एक आंतरराष्ट्रीय दर्जाचं कृषी परिषद केंद्र स्थापन केलं जाणार आहे. यासाठी 150 कोटी रुपयांचा प्रस्ताव केंद्रीय कृषी मंत्रालयाकडे पाठवला असल्याची माहिती केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी दिली. ते आज डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठाच्या मैदानावर आयोजित 13 व्या ॲग्रो व्हिजन कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटन समारोहात बोलत होते. या परिषद केंद्राला आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचं आश्वासन केंद्रीय कृषीमंत्री नरेंद्रसिंह तोमर यांनी दिल्याचं गडकरी यांनी सांगितलं.

प्रमुख पाहुणे म्हणून मध्य प्रदेशाचे मुख्यमंत्री शिवराजसिंग चौहान उपस्थित होते. अॅग्रोव्हिजन कृषी क्षेत्रासाठी दिशादर्शक आहे. मध्यप्रदेश सरकारनं गेल्या अनेक वर्षांपासून परंपरागत शेती टाळून अॅग्रो व्हिजन'मधल्या सूचनांचा, तसेच नवीन तंत्राचा वापर करून शेती समृद्धीच्या स्तरावर नेऊन ठेवली आहे, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

केंद्रीय नागरी हवाई वाहतूकमंत्री जोतिरादित्य शिंदे यांनी आज कागल येथे युवा मतदारांची भेट घेऊन थेट संवाद साधला. त्यांच्या अपेक्षा जाणून घेण्याचा प्रयत्न केला. आठ वर्षांपूर्वी जगात भारतीय अर्थव्यवस्था ११ व्या क्रमांका वर होती. आठ वर्षांत भारतीय अर्थव्यवस्था जगात ५ व्या क्रमांका वर आणण्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नांना यश आलं आहे. २०३० पर्यंत आपण जपान आणि जर्मनीला मागे टाकून तिसऱ्या क्रमांकावर येण्याचे ध्येय ठेवलं आहे. लोकशाहीत विकास आणि प्रगतीचा मार्ग प्रशस्त आणि सर्वसमावेशक झाला, तर देशाची प्रगती लवकर होते, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालाला चांगला भाव मिळावा यासाठी सातारा जिल्ह्यात पाचशे एकर क्षेत्रात कृषी उद्योग उभारण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. ते आज कराड इथं, राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित कृषी प्रदर्शनाचं उद्घाटन केल्यानंतर बोलत होते.

यशवंतराव चव्हाण यांची नाळ शेतकरी आणि कष्टकऱ्यांबरोबर जोडलेली होती. त्यांच्याच विचारावर राज्य शासन काम करत आहे, असं ते म्हणाले. पारंपरिक

शेतीला अत्याधुनिक शेतीची जोड देत शेतकरी सेंद्रीय शेतीकडेही वळत आहेत, असं त्यांनी सांगितलं.

करा़ड इथल्या ५ मजली नवीन प्रशासकीय इमारतीचं लोकार्पण आज त्यांच्या हस्ते झालं. कराड इथं छत्रपती संभाजी महाराज स्मारकाचं भूमिपूजनही मुख्यमंत्र्यांनी केलं. यावेळी राज्य उत्पादन शुल्क मंत्री तथा पालकमंत्री शंभूराज देसाई, उद्योग मंत्री उदय सामंत, माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान आमदार पृथ्वीराज चव्हाण, आमदार महेश शिंदे, आदी उपस्थित होते.

**<><><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात ऑकलंड इथं आज झालेल्या मालिकेतल्या पहिल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात न्यूझीलडनं भारताचा ७ गडी राखून सहज पराभव केला आणि ३ सामन्यांच्या मालिकेत १- ० अशी आघाडी घेतली आहे. विजयासाठी ३०७ धावांचं लक्ष्य घेऊन मैदानात उतरलेल्या न्यूझीलंडनं ४८ व्या षटकातच लक्ष्य पूर्ण केलं. त्यांची ३ बाद ३०९ अशी धावसंख्या झाली. टाॅम लॅथमनं न्यूझीलंडसाठी १०४ चेंडूत १४५ धावांची खेळी केली. तो नाबाद राहिला. त्यालाच सामनावीराचा सन्मान मिळाला. केन विल्यमसननं ९४ धावा करून त्याला सुरेख साथ दिली.

तत्पूर्वी भारतानं ५० षटकात ७ गडी बाद ३०६ धावा केल्या. श्रेयस अय्यरनं ७६ चेंडूत ८० धावा केल्या. शिखर धवननं ७२, शुभमन गिलनं ५० धावा करून भारताच्या धावसंख्येला आकार दिला. पुढचा एकदिवसीय सामना येत्या रविवारी हॅमिल्टन इथं होणार आहे.

**<><><><><><>**

फिफा विश्वचषक फूटबॉल स्पर्धेत ब गटातल्या सामन्यात आज इराणनं वेल्सवर २-० गोलफरकानं विजय मिळवला. रोमांचक सामन्यात शेवटच्या मिनिटाला रोझबेह छेशमी आणि रामिन रेझेयान यांनी प्रत्येकी एक एक गोल करत इराणला विजय मिळवून दिला. कतार आणि सेनेगल यांच्यात अ गटातला सामना झाला.

तिसरा सामना अ गटात नेदरलॅन्डस आणि इक्वेडोर यांच्यात रात्री साडेनऊ ला होणार आहे.

**<><><><><><>**

जागतिक नेत्यांच्या क्रमवारीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी पहिल्या स्थानावर कायम आहे.  अमेरिकेतल्या मॉर्निंग कन्सल्ट या मानांकन संस्थेनं प्रसिद्ध केलेल्या जागतिक नेतृत्व मानांकनात मोदी सर्वात लोकप्रिय नेते ठरले आहेत. त्यांच्या पाठोपाठ मेक्सिकोचे अध्यक्ष अँड्रेस मॅन्युएल लोपेस ओब्राडोर दुसऱ्या, तर ऑस्ट्रलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानिस तिसऱ्या स्थानावर आहेत.

अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडेन नवव्या, तर युनाएटेड किंगडमचे प्रधानमंत्री ऋषी सुनक त्यांच्या मागं आहे. १६ ते २२ नोव्हेंबर या काळात संकलित केलेल्या माहितीच्या आधारे हे मानांकन दिलं आहे.

**<><><><><><>**

गुजरात विधानसभा निवडणूकीच्या पहिल्या टप्प्याचा प्रचार संपायला आता काहीच दिवस उरल्यानं, सर्वच राजकीय पक्ष, मतदारांना आकर्षित करण्यासाठी जीवाचं रान करत आहेत. भाजपच्या प्रचाराची धुरा केन्द्रीय मंत्री अमित शहा यांच्यासह अनेक वरिष्ठ भाजपा नेते सांभाळत आहेत. अमित शहा यांची आज महुधा मतदार संघातल्या नडियाद इथं सभा झाली.  कांग्रेसनं लोकांमधे फूट पाडण्यासाठी देशावर राज्य केलं असं ते म्हणाले.

**<><><><><><>**

केन्द्र सरकारनं, यावर्षी एप्रिल ते जून या काळातल्या थकीत जीएसटी भरपाई पोटी १७ हजार कोटी रुपये आज राज्य आणि केन्द्रशासित प्रदेशांना जारी केले.

//<><><><><><>//